महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - ११ वे ■ अंक क्र. - २८९ ■ मंगळवार दि.१० जून २०२५ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

WWW.DAILYAWAZ.COM

आपला व्यवसाय वृद्धिंगत होण्यासाठी दैनिक आवाजमध्ये जाहिरात करण्याची सुवर्णसंधी!

एक महिना - २४९९/- रु.
तीन महिने - ५९९९/- रु.
सहा महिने - ९९९९/- रु.

* संपादक *
मो. क्र. ९५४५९१०१७७/८९९९९२१९९४

## नगरसूल, हडप सावरगावला वादळी पावसाच्या तडाख्यामुळे घरांचे पत्रे उडाले, चार ते पाच जण जखमी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी - नगरसूल-हडप सावरगावला शनिवार ता.७ सायंकाळी अचानक आलेल्या मॉन्सून पूर्ण वादळी पावसाच्या तडाख्यात अनेक घरांचे पत्रे उडाल्याने पडझड झाली. चार ते पाच जण जखमी झाले आहेत. अनेक ठिकाणी विजेचे खांब व वृक्ष उन्मळून पडले.



येथील पवार वस्तीवर शरद किसन पवार यांच्या घराचे संपूर्ण पत्रे उडून शंभर ते दिडशे फुटांपर्यंत जाऊन पडले.या घटनेत आराध्या बंड ही (वय १२) मुलगी गंभीर जखमी झाली आहे.तर शरद पवार, श्रावण पवार हे किरकोळ जखमी झाले. सोलर, पाण्याच्या टाक्या,संसार उपयोगी वस्तू, अन्न धान्य आदीचे फुटतुट होऊन मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. हडप सावरगाव येथील योगेश घोडेस्वार, निवृत्ती घोडेस्वार, सिताराम घोडेस्वार यांच्या घराचे पत्रे उडाल्याने मोठे नुकसान झाले आहे.तसेच बबन कोल्हे यांच्या घराचे पत्रे देखील उडाले आहे.

भागवत काजळे यांच्या घरासमोर बांधलेल्या गाईला उडालेले पत्रे लागल्यामुळे मानेवर कापले गेले. व त्यामुळे तीनशे टाके पडले. तसेच पंडित झाल्टे यांचे पत्र्याचे शेड उडाले. कुसमाडी परिसरात देखील वृक्ष उन्मळून अनेक ठिकाणी शेतकऱ्यांचे नुकसान झाले. दरम्यान शिवसेना नेते संभाजी पवार यांनी नगरसूल येथिल शरद पवार, हडप सावरगाव येथील योगेश घोडेस्वार, निवृत्ती घोडेस्वार, बबन कोल्हे यांच्या नुकसान झालेल्या घरांची पाहणी करून, जखमीची विचारपूस केली. संबंधीत अधिकाऱ्यांना नुकसानीचे पंचनामे करून नुकसान ग्रस्थांना तातडीने नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. तसेच युवा नेते सुनील पैठणकर,पंचायत समितीचे माजी सभापती ॲड. मंगेश भगत, सोसायटीचे माजी अध्यक्ष विकास निकम,कांतीलाल साळवे,सरपंच दत्तू देवरे,रामनाथ कोल्हे आदींनी नुकसान झालेल्या शेतकऱ्यांची भेट घेऊन शासकीय मदत त्वरित मिळण्याची मागणी केली आहे.

## बनावट ॲप घोटाळ्यातील कारवाईसाठी शिंगणापुरात धरणे आंदोलन

**दै. आवाज वृत्तसेवा...**

(नेवासा प्रतिनिधी) :- शनिशिंगणापूर मधील बनावट प घोटाळ्याची तातडीने चौकशी व्हावी व तातडीने कारवाई व्हावी यासाठी काँग्रेस व विविध संघटनांकडून शिंगणापूर देवस्थान आवारात धरणे आंदोलन करण्यात आले.





शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी, पुजाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत पच्या ऐवजी बनावट ॲप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून तसेच बनावट देणगी पावती व बनावट QR च्या माध्यमातून करोडो रुपयाचा घोटाळा करून हा निधी आपल्या खाजगी खात्यावर वळून घेतला. यात देवस्थानची व देशभरातील शनिभक्तांची मोठी लूट या घोटाळा बहाद्दरांनी करून दाखवली. याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक व धर्मदाय उपायुक्त यांची भेट घेऊन चौकशीची मागणी देखील केली.तर देवस्थान प्रशासनाकडे त्यांनी परवानगी दिलेल्या पबद्दल माहिती मागण्यात आली होती. यामध्ये धर्मदाय आयुक्त यांचे परवानगी पत्र, ट्रस्टचा ठराव, करारनामा अशी माहिती मागण्यात आली होती. देवस्थान प्रशासनाने हि माहिती देण्यास टाळाटाळ केल्याने व घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घातल्याने इतर पची माहिती दाबण्याचा प्रयत्न केल्याने आज देवस्थान आवारात काँग्रेस व विविध संघटनाकडून देवस्थान आवारात भर उन्हामध्ये धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी या घोटाळ्याचा तीव्र गतीने तपास करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी देवस्थान प्रशासनाने फक्त तीन पवर कारवाईची मागणी करून इतर ॲपवाल्यांना व बनावट पावती पुस्तकं घोटाळे बहाद्दरांना पाठीशी घालणे ही अत्यंत दुर्दैवी गोष्ट आहे. पूर्ण कारवाई होईपर्यंत स्वस्थ बसणार नाही असे स्पष्ट केले. शेतकरी संघटनेचे अशोकराव काळे यांनी या घोटाळ्यात देवस्थानचे कर्मचारी, पुजारी, अधिकारी सहभागी असल्याचा आरोप करत भाविकांच्या श्रद्धेला यांनी गंडा घातल्याचा आरोप केला. हरीश चक्रनारायण यानी देवस्थान आता सरकार जमा करण्याची वेळ आली असून प्रशासकाची याठिकाणी गरज आहे त्याशिवाय भ्रष्टाचार दूर होऊन कारभार सुरळीत होणार नाही. तसेच यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल,महिला अध्यक्ष शोभा पातारे, स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे,बहुजन वंचितचे विजयसिहं गायकवाड, संजय वाघमारे यांनी देखील याविरोधात मनोगत व्यक्त केले. तर आंदोलनात संजय होडगर, कानिफ जगताप, सुमित पटारे, संदीप मोटे, सतीश तऱ्हाळ, गोरक्षनाथ काळे, आदीसह शनिभक्त सहभागी झाले होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय माळी यांना निवेदन दिले यात पुढील आठ दिवसात योग्य तपास न झाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.




श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

* शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून
B.A./B.Com/B.Sc साठी प्रवेश देणे सुरू आहे.
प्रवेश पात्रता - १२ वी पास (आर्टस्, कॉमर्स, सायन्स)




* वैशिष्टे *
* उच्च शिक्षित प्राध्यापक वर्ग
* भव्य प्रशासकीय व महाविद्यालय इमारत
* सि.सि.टि.व्ही. कॅम्पस
* ग्रथालय व वाचनालय स्वतंत्र इमारत
* मुला-मुलींसाठी स्वतंत्र वसतीगृह सुविधा
* भव्य सेमिनार हॉल व खेळाचे मैदान
* मर्यादित विद्यार्थी संख्या

प्रवेशासाठी संपर्क :- ९९२२१७२७९९
पत्ता - कै. गंगाराम धनसिंग राठोड शैक्षणिक संकुल, महादेव रोड, वसंत नगर, पो.जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक.
* प्राचार्य :- मोबा. 9922172799

श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी संस्था, संचलित
श्री पिनाकेश्वर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
(पुणे विद्यापीठ संलग्न)
वसंतनगर, पो. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक-४२३१०६

प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया
(राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०) शैक्षणिक वर्ष २०२५-२६

पदवी अभ्यासक्रम

| | | |
|---|---|---|
| B.A.<br>(Bachelor of Arts Specialization)<br>B.A. Eniglish<br>B.A. Marathi<br>B.A. Hindi<br>B.A. History<br>B.A. Geography<br>B.A. Economice<br>B.A. Politics | B.Sc.<br>(Bachelor of Science Specialization)<br>B.Sc. Chemistry<br>B.Sc. Physics<br>B.Sc. Micro Biology<br>B.Sc. Botany<br>B.Sc. Zoology | B.Com.<br>(Bachlor of Commerce)<br>Business<br>Administration<br>Marketing |

प्रवेशासाठी खालील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करणे आवश्यक असेल
१) ॲडमिशन फॉर्म
२) मुळ कागदपत्र (Orignal L.C.) व दोन स्वयंसाक्षांकित प्रती
३) गुणपत्रकाच्या दोन स्वयंसाक्षांकित प्रती
४) जातीचा दाखला व दोन स्वंयसाक्षांकित प्रती (आवश्यक असल्यास)
५) आधार कार्ड दोन स्वयंसाक्षांकित प्रती
६) शिक्षणात खंड असेल तर गॅप सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा.

टिपः महाविद्यालय सोडल्याचा मूळ दाखला सर्टिफिकेट आपल्याकडे स्कॅन स्वरूपात ठेवावा. सदर कागदपत्र शिष्यवृत्ती फॉर्म भरण्यासाठी आवश्यक आहे.

* अधिक माहितीसाठी संपर्क *
* प्राचार्य :- मोबा. 9922172799



## आज विंचूरला छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर (प्रतिनिधी) - विंचूर महसूल मंडळाच्या वतीने विंचूर महसूल मंडळातील सर्व शेतकरी व नागरिकांसाठी आज मंगळवार दि.१० जून रोजी सकाळी ११:०० वा.तलाठी कार्यालय विंचूर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान आयोजित करण्यात आले आहे. सदर अभियानांतर्गत विविध दाखले वाटप, फेरफार नोंदी, कजाप नोंदी, शिव रस्ते, पानंद रस्ते बाबत व शेतकरी व शेतीशी निगडीत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.तरी विंचूर महसूल मंडळातील सर्व शेतकरी व नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सदर अभियानाचा लाभ घ्यावा.असे आवाहन विंचूर मंडल अधिकारी व ग्राम महसूल अधिकारी विंचूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पै. सुभाष दादा पाटील युवा फाउंडेशन यांच्या वतीने राष्ट्रीय पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**



जे.के.गोरंबेकर/कागल - पै. सुभाष दादा पाटील युथ फाउंडेशन महाराष्ट्र पिंपळगाव बुद्रुक तालुका कागल यांच्या वतीने सामाजिक ,शैक्षणिक ,युवा उद्योजक ,पत्रकार ,आरोग्य सेविका ,कला ,क्रीडा ,साहित्य अशा क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम केलेल्या देशातील १५० लोकांचा युथ फाऊंडेशन चे अध्यक्ष पैलवान सुभाष दादा पाटील, रंगराव पाटील ब्रँच पोस्ट मास्तर पिंपळगाव मा. सौ. रागिनी खडके मॅडम इन्स्पेक्टर धर्मादाय कार्यालय कोल्हापूर कार्याध्यक्ष बाळूमामा देवालय आदमापूर, सौ. स्मिता राणी गुरव पंचायत समिती सभापती गारगोटी, सौ. वैशाली झांजगे मॅडम रयत विद्यार्थी विचार मंच जिल्हा कार्याध्यक्ष युवराज मिरजकर सर वेदिका कन्सल्टन्सी अँड सर्विसेस डायरेक्टर सौ. अनिता रावण अध्यक्ष सावित्रीबाई महिला बहू उदय संस्था मानव सुरक्षा सेवा समिती कोल्हापूर जिल्हाध्यक्ष सौ. नंदाताई विभुते अध्यक्ष यशराज महिला मंच कराड व इतर प्रमुख मान्यवर उपस्थित होते या सर्व प्रमुख पाहुणेच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला या कार्यक्रमाची प्रास्ताविक सूत्रसंचालन अनिता घाडगे मॅडम यांनी केले.

## नरेंद्र कुलकर्णी यांचे निधन



**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर - लासलगाव येथील नरेंद्र वसंतराव कुलकर्णी वय (७७) यांचे नुकेतच अल्पशः आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, मुलगा, सुन, नातवंडे असा परिवार आहे. येथील वेदमूर्ती दिपक गुरुजी यांचे वडील होत.

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने व्हावे वृक्षारोपण

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भारतीय संस्कृतीत प्रत्येक झाडांना आगळेवेगळे स्थान व महत्त्व आहे.त्यात वटवृक्ष म्हणजे मायेची सावली व शांतीचे प्रतीक आहे.वटपौर्णिमेला भारतीय संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.सावित्री हे भारतीय संस्कृतीत एक ऐतिहासिक पात्र मानले जाते.सावित्री म्हणजे वेद माता गायत्री आणि सरस्वती. वटवृक्ष एक विशालकाय वृक्ष आहे.ज्यामध्ये त्या झाडाची जटा लटकत असतात.यालाच सावित्री देवी मानले जाते.हिंदु पुराणात ब्रम्हा, विष्णू आणि महेश हे वटवृक्षात राहतात असे मानले जाते.या झाडांच्या मुळामध्ये ब्रम्हा, मध्यभागी विष्णू आणि वरच्या भागात शिव आहे.म्हणून या झाडाच्या पुजेला अत्यंत महत्व आहे.कारण वटवृक्षाच्या पुजेने साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचे दर्शन होते.त्यामुळे आज आपल्याला अशाच वृक्षांची नितांत गरज आहे.यावरून स्पष्ट होते की वटवृक्ष एक दैवी शक्तीचे प्रतीक आहेच हे आपल्याला पुराण सुद्धा सांगते.परंतू आज मानवाचा व संपूर्ण जीवजंतूच्या कल्याणासाठी व जीवनमरणाचा प्रश्न ऑक्सिजनवर येवुन ठेपला आहे. कारण दिवसेंदिवस पृथ्वीतलावरील ऑक्सीजनचे प्रमाणात कमी-कमी होत आहे.यामुळे मानवासह संपूर्ण जीवजंतूचे जीवन धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे. त्यामुळे आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात वृक्षलागवडीला प्रथम प्राधान्य देणे गरजेचे आहे.कारण आपण जेवढे वटवृक्ष लावू तेवढीच ऑक्सिजनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होवून मानव,पशुपक्षी व पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीत आल्हाददायक वातावरणात निर्माण होण्यास मोठी मदत होईल.आज आपण लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक झाडात, पानात, फुलात, मुळात, फळात देवी-देवतांचा वास आहे. त्यामुळेच आपण आज या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत व मोकळा श्वास घेऊ शकतो.परंतु वृक्ष तोड किंवा जंगल तोड वेळीच थांबली नाही तर पृथ्वीतलावरील संपूर्ण जीव सृष्टीचा विनाश कोणीही रोखू शकणार नाही हे सुद्धा कटु सत्य आहे. त्यामुळे प्रत्येक सन-ला, वाढदिवसाला, लग्न कार्यक्रम या दिवसाला वृक्ष लागवड व्हायलाच हवी.वटपौर्णिमेप्रमाणे ३६५ दिवसांमध्ये जे कोणते



**रमेश लांजेवार**
(प्रदेश प्रवक्ता)
(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)
मो.नं.९९२१६९०७७९,
नागपूर.

सण येतात त्या-त्या सणाला वृक्षारोपण करून आगळावेगळा उपक्रम राबवायला हवा.तुळशी विवाहाच्या दिवशी तुळशीचे सुध्दा वृक्षारोपण व्हायला हवे.असे जर झाले तर देशात दरवर्षी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड होईल व ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मोठी मदत होईल. आपण जगात किंवा भारतात जी काही औषधे पहातो ती कोणतीही असो उदा-हरणार्थ ऍलोपॅथिक,आर्युवेदिक, होमिओपॅथिक किंवा जडी-बुटी या ज्या औषधी तयार होतात त्या संपूर्ण वनस्पती पास-ूनच तयार होतात.त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. सावित्री आणि सत्यवान यांची कथा अनेक पुराणांमध्ये पहायला मिळते.नारद मुनी सावित्रीला सत्यवानशी लग्न न करण्याचा सल्ला देते.कारण सत्यवान यांचे जीवन काही काळापर्यंत मर्यादित असते.परंतु सावित्री नारदमुनीला न जुमानता सत्यवानशी लग्न करते. तीला पतीच्या मृत्यूची तारीख माहीत असते.अशा परिस्थितीत शिल्लक रहालेल्या दिवसात सावित्री कठोर तपश्चर्या करते.परिणामत: आपल्या पतीला मृत्यूच्या खाईतून बाहेर काढते.यामागे वटवृक्षाची लीला असते.कारण वटवृक्षांमध्ये ब्रम्हा, विष्णू आणि महेश यांचा वास आहे हे सावित्रीला तपश्चर्ये दरम्यान लक्षात आले व सावित्रीच्या मदतीसाठी स्वयंम ब्रम्हा, विष्णू आणि महेश प्रगट होतात व सावित्रीची मनोकामना पूर्ण होते.हे आपल्याला पुराणात सांगितले आहे.त्याच अनुषंगाने वटपौर्णिमेला वडाच्या झाडाची पूजा करून महिला सुख-समृध्दीची आराधना करतात व वटवृक्षाच्या रूपात विराजमान असलेले ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे साक्षात दर्शन घेऊन महिला स्वतःला धन्य मानतात.परंतु आज वटवृक्षाची गरज आपणासर्वांनाच आहे.कारण सत्यवानाला वाचवीण्यासाठी सावित्रीने वटवृक्षाचा सहारा घे-तला व वटवृक्षाने सावित्रीला सत्यवानाला वाचविले सुध्दा. आज आपल्याला देशाच्या १४० कोटी जनतेचे प्राण वाचवायचे आहे. यासाठी आपल्याला सुध्दा वृक्षलागवडीच्या माध्यमातून तपश्चर्या करावीच लागेल.तेव्ह-ाच आपल्याला मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनची मात्रा मिळण्यास मोठी मदत होईल व आपणा सर्वांना वटवृक्षाच्या रूपात साक्षात ब्रम्हा, विष्णू आणि महेश व सावित्री यांचे दर्शन होईल.भारतीय संस्कृतीतील कोणताही सण असो त्यामागे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक,धार्मिक, आरोग्य विषयक इत्यादींना धरून असतोच.त्यामुळे सर्वांनीच वृक्ष लागवडीकडे जास्तीत जास्त लक्ष देण्याची गरज आहे. वटवृक्ष हा मायेचा आधार आहे कारण तो सर्वांना सावली देतो. त्यामुळे वटवृक्ष हे शांतीचे व मांगल्याचे प्रतीक सुध्दा आहे. सध्याच्या परिस्थितीत पृथ्वी,जल,वायु धोकादायक स्थितीमध्ये आहे. त्यांना वाचविण्याची संपूर्ण जबाबदारी मानवाची आहे. कारण मानव हा बुध्दीजीव प्राणी आहे. आज पृथ्वीतलावर जगात जी काही विनाश लीला दिसत आहे त्याला दोषी फक्त मानवच आहे. ही विनाश लीला रोखण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आज वृक्ष म्हणजे दैवी शक्तीच आहे. वड, आंबा, आवळा, कडुनिंब, उंबर, केळी, आपट्याचे झाड, बेल, पळस, कुड्याची पाने, इत्यादीसह अनेक झाडांच्या पानांचा, फुलांचा व फळांचा पुजेमध्ये वापर करीत असतो. आज स्त्री शक्ती वृक्षांना वाचवीण्यासाठी वृक्षांची पुजा अर्चना करीत आहे.तर मनुष्य दुसरीकडे जंगल तोड करीत आहे याला कुठेही थांबवायला हवे. पर्यावरण रक्षणासाठी १९७३ मध्ये चिपको आंदोलन करण्यात आले यात मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेवून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड थांबवीली. यामागचा उद्देश म्हणजे झाडांना वाचवीने.या आंदोलनामुळे शेकडो झाडे, हजारो पक्षी व प्राण्यांची निवासस्थाने वाचली. झाडे लावा,झाडे जगवा,निसर्ग सुरक्षित तर आपण सुरक्षित, आपण सुरक्षित तर देश सुरक्षित, देश सुरक्षित तर जग सुरक्षित हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारला पाहिजे. यामुळे संपूर्ण सृष्टीत प्रफुल्लित होईल. वटपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

# सप्तशृंग गड येथील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात

**दै. आवाज वृत्तसेवा...**

सोमनाथ मानकर, सप्तश्रृंग गड - येथील इयत्ता १० वी व १२ वीमध्ये यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व सन्मानचिन्हे देऊन गुणगौरव व सत्कार करण्यात आला हा सोहळा उत्साही वातावरणात पार पडला. सदर कार्यक्रम चालतं बोलतं मदत केंद्र गृप सप्तश्रृंगगड संस्थापक व उपसरपंच संदीप बेनके यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जयश्री पवार होत्या. यावेळी सरपंच रमेश पवार,ग्रामपंचायत सदस्य राजेश गवळी, शांताराम सरगिर ग्रामसेवक संजय देवरे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अजय दुबे, श्री सप्तशृंग निवासिनी देवी ट्रस्ट कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर, कार्यालयीन अधीक्षक प्रकाश जोशी, किरण डांगे गडावरील ग्रामस्थ व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याचे कारण येणाऱ्या पिढीने यापुढे अशाच प्रकारे हे यश संपादन करून मानसन्मान मिळवावा यासाठी हा छोटासा प्रयत्न करण्यात आला.**
**- उपसरपंच संदीप बेनके सर गड**

**महाराष्ट्र मध्ये अशाच प्रकारे निवडून येणारा विद्यार्थ्यांचा मान सन्मान केला तर भावी पिढी यासाठी नक्कीच प्रयत्न करेल आणि हा सत्कार त्यांचे यशाला समर्पित कारण त्यांनी यशासाठी दिवस रात्र मेहनत केलेली असते.**
**- माजी जिल्हा परिषद अध्यक्ष जयश्री ताई पवार१**

# साहेबराव नंदन तात्या तिसऱ्या जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित

**दै. आवाज वृत्तसेवा...**



नाशिक - काळीज माझं साहित्य व सामाजिक साहित्य समुह छत्रपती संभाजी नगर यांच्या सामाजिक संस्थेच्या तीसऱ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कवी संमेलन नाशिक येथे पार पडलेल्या काव्य मैफीलीत मुळगाव ताहाराबाद ह. मु. नाशिक येथील सगर समाज बांधव कवी लेखक संपादक गावगाडाकर साहेबराव नंदन तात्या यांना राज्यस्तरीय जीवनगौरव पुरस्काराने जेष्ठ साहित्यिक चंद्रकांतदादा वानखेडे यांच्या अध्यक्षतेखाली व शुभहस्ते, तसेच कवी, संपादक गुलाबराजा फुलमाळी, गिरणा गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश पवार, साहित्यिक रविंद्रदादा मालूंजकर , संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा बेंद्रे, कवयित्री सौ. शारदा भामरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत साहेबराव नंदन तात्यांना मानाचा फेटा, शॉल श्रीफळ बुके ट्रॉफी व सन्मान पत्र देऊन टाळ्यांच्या गजरात सन्मानित करून गौरविण्यात आले. साहेबराव नंदन तात्यांना या आधीही अनेक राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शेकडो सन्मान पत्रांचे ते मानकरी असून, खा-न्देशातील नामवंत कवी लेखक संपादक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या नावावर गावगाडा काव्य संग्रह, परिसस्पर्श कादंबरी, सगर रत्न विशेषांक , सगर सेवार्थी अंक, स्नेहबंध साहित्य विशेष , सगर दीपोत्सव दिवाळी अंक प्रसिद्ध आहेत. गावकुसाच्या मातीतील अस्सल ग्रामिणबाज असलेल्या कथा, अहिराणी कविता, अलक, लघुकथा लिहिण्यात ते माहिर आहेत. मान सन्मान पुरस्कार आणि साहेबराव नंदन तात्या हे समिकरणच होऊन बसले आहे. मध्यमवर्गीय कुटुंबातील प्रतिकुल परिस्थिती गरीबीची असली तरी साहित्य क्षेत्रात ते श्रीमंत आहेत. दिलदार मनाच्या हळव्या साहित्यिकाचा सन्मान हा खऱ्या अर्थाने खांन्देशच्या मातीचा सन्मान असल्याच्या प्रतिक्रिया उमटत आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद (८९९९२१९९४). या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायक्षेत्र) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ - ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# धावत्या लोकलमधून प्रवासी पडले : १० जण जखमी तर ५ जणांचा मृत्यू

दै. आवाज वृत्तसेवा...

सुरेश जगताप ठाणे :- मध्य रेल्वेच्या दिवा- मुंब्रा स्थानकादरम्यान आप अँड डाऊन मार्गावरून जाणाऱ्या धावत्या ट्रेनमधून पडून ५ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना काल सकाळी ९ वाजेच्या सुमारास घडली असून त्यात १० प्रवासी जखमी झाले असल्याचे बोलले जात आहे. या सर्वांवर कळवा येथील छत्रपती शिवाजी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार फास्ट लोकल एकमेकांच्या शेजारून जात असतानाच हा भीषण अपघात झाला. मुंब्रा आणि दिवा रेल्वे स्थानकांदरम्यान सी.एस.टी लोकल आणि कसारा लोकल एकमेकांना ओलांडत असताना ही घटना घडली. एक लोकल कसाऱ्याकडे तर दुसरी कसारा लोकल ही सी.एस.टी कडे जात



असताना ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच रेल्वे प्रशासनाकडून रुग्णवाहिका पाठवण्यात आल्या आणि जखमींना जवळच्या रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आलं आहे. सी.एसं टी कडून कसाऱ्याकडे जाणाऱ्या फास्ट लोकलमधून पडून या प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

दुसरी लोकल सी एस टी कडे जात असताना कसारा फास्ट लोकल बाजूने जात होती. त्याचवेळी काही प्रवासी हे लोकल ट्रेनमधून पडले. यामध्ये सात पुरुष आणि एका महिलेचा समावेश होता अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. ठाण्यातील मुंब्रा रेल्वे स्थानकावर सी एस टी कडे जाणारे काही प्रवासी ट्रेनमधून पडले. ट्रेनमध्ये जास्त गर्दी असल्याने हा अपघात झाल्याचे बोलले जात आहे. रेल्वे प्रशासन आणि पोलिसानी घटनास्थळी जाऊन जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. अपघाताची चौकशी सुरू झाली आहे. या घटनेमुळे स्थानिक सेवांवरही परिणाम झाला आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज सर्किट विशेष पर्यटक रेल्वेचे माणगाव येथे जल्लोषात शाही स्वागत

दै. आवाज वृत्तसेवा...

बोरघर / माणगांव ( विश्वास गायकवाड ) महाराष्ट्र शासन व भारतीय रेल्वे खानपान व पर्यटन महामंडळाने ऐतिहासिक व सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनगौरवाचा अनुभव देण्यासाठी भारत गौरव टुरिस्ट ट्रेन अंतर्गत आज पासून प्रवासासाठी निघालेल्या विशेष पर्यटक रेल्वे 'छत्रपती शिवाजी महाराज सर्किट'चे माणगाव रेल्वेस्थानकावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. या सर्व पर्यटकांनी आज दुर्गराज रायगडला भेट देऊन पाहणी केली.

या विशेष रेल्वेच्या माणगाव स्थानकावर आगमनप्रसंगी खा. सुनील तटकरे, अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, माणगाव तहसीलदार दशरथ काळे, भारतीय रेल्वे पर्यटन मंडळ अधिकारी श्रीमती गुप्ता यांसह रेल्वे चे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या विशेष रेल्वे मधुन प्रवास करणाऱ्या पर्यटकांचे रेल्वे स्थानकावर रायगड जिल्हा प्रशासनाने पारंपरिक ढोल-ताशाच्या गजरात




औक्षण करून स्वागत केले. तसेच पर्यटकांना पुष्प गुच्छ देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. पर्यटकांना दुर्गराज रायगडची पर्यटनाच्या दृष्टीने माहिती देणारी घडी पुस्तिका वाटप करण्यात आले. शिवराज्याभिषेक दिनाच्या मुहूर्तावर स्वराज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला पहायला, अनुभवायला मिळणार म्हणून पर्यटकामध्ये उत्साही वातावरण होते.

छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी जय शिवाजी च्या जयघोषाने माणगावरेल्वे स्थानक काही काळ दुमदुमून गेले होते. एकूण १८ बसेस मधून हे सर्व पर्यटक रायगड किल्ल्यासाठी रवाना झाले. दिवसभर रायगड किल्ल्याची पाहणी केल्यानंतर सायंकाळी ही विशेष रेल्वे पुण्याकडे प्राण करणार आह. ५ दिवसांच्या या प्रवासात रेल्वे स्थानकांपासून ते महाराजांच्या गडकिल्ल्यांपर्यंत, प्रत्येक ठिकाणी इतिहासाच्या पाऊलखुणांचा वेध घेत, पर्यटकांना पर्यटनाचा आनंद घेणार आहेत.

या पाच दिवशीय विशेष रेल्वेचे नियोजन पुढीलप्रमाणे

लाल महाल, पुणे – छत्रपती शिवाजी महाराज यांचे बालपण येथे गेले.

कसबा गणपती व शिवसृष्टी, पुणे – पुण्याचे ग्रामदैवत व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील संग्रहालय.

शिवनेरी किल्ला – छत्रपती शिवाजी महाराज यांचे जन्मस्थळ.

भीमाशंकर ज्योतिर्लिंग – १२ ज्योतिर्लिंग पैकी एक प्रमुख धार्मिक स्थळ.प्रतापगड किल्ला – अफझल खानावरील ऐतिहासिक विजयाचे ठिकाण.कोल्हापूर – महालक्ष्मी मंदिर, पन्हाळा किल्ला – बाजीप्रभू देशपांडे यांच्या शौर्याचे प्रतीक.

# खरीप हंगामपुर्व विकसीत कृषि संकल्प अभियान

दै. आवाज वृत्तसेवा...

नांदगांव: मारुती जगधने – राष्ट्रीय अभियान कृषी संशोधन व शिक्षण विभाग भारतीय कृषी अनुसंधान परिषद व कृषी व शेतकरी कल्याण विभाग कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित कृषि संकल्प अभियान हे राष्ट्रीय अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने कृषि विभाग मार्फत मौजे कोंढार विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे कार्यक्रम घेण्यात आला सदर अभियानात कृषी विज्ञान केंद्र वडेलचे रूपेश खेडकर, विषय विशेषज्ञ, यांनी मका पिक लागवड तंत्रज्ञान व्यवस्थापन व विजय शिंदे विषय विशेषज्ञ यांनी ट्रायकोडर्मा गांडूळ खत निविष्ठा वापर बाबत तसेच डाळिंब फळबाग भाजीपाला बाबत मार्गदर्शन केले व भारतीय कृषि अनुसंधान परिषद चे शास्त्रज्ञ (रासायनिक अंश तपासणी प्रयोगशाळा पुणे) रामटेके यांनी पीक संजीवके बाबत माहिती



दिली. तसेच राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र पुणे ए के उपाध्याय , यांनी माती व पाणी तपासणी करून खत मात्रा व्यवस्थापन व पिक संजीवके याविषयी मार्गदर्शन केले. त्यानंतर इ.एम.अंभोरे मंडळ कृषी अधिकारी मनमाड यांनी कृषि विभागाच्या विविध योजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच बियाणे उगवण क्षमता चाचणी, बीजप्रक्रिया याविषयी एस.टी.करण सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक आत्मा नांदगाव यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास गावचे सरपंच, पोलीस पाटील व नांदुर येथील देविदास कोल्हे व साहेबराव धिवर इत्यादी सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यात आले.

# लहित सोसायटी चेअरमनपदी खंडू सोनवणे, व्हा.चेअरमन रामदास भालेराव यांची निवड



दै. आवाज वृत्तसेवा...

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी – लहित महाराणा प्रतापसिंह सहकारी सोसायटीच्या चेअरमन पदी खंडू सोनवणे तर व्हा चेअरमन पदी श्री रामदास भालेराव यांची बिनविरोध निवड येवला सहाय्यक निबंधक कार्यालय येथे संचालक मंडळाच्या बैठकीत पार पडली संजय जाधव यांनी चेअरमन पदाचा तर नामदेव घुले यांनी व्हा चेअरमन पदाचा राजीनामा दिल्याने हि निवडणुक घेण्यात आली. सहाय्यक निबंधक विजयशिंग राजपुत यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीमती भांबरे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.या वेळी सरपंच दत्तु देवरे.संचालक.प्रेमचंद परदेशी माधव शेजवळ.शामराव शेजवळ.नामदेव घुले संजय जाधव.नारायण परदेशी.कचरु बिन्नर. योगेश सदगीर.रंभाबाई. करवर.चंद्रकला शेजवळ.भारत राजपूत.रामनाथ कोल्हे दत्ता शेजवळ. शंकर राजपुत.अंबर परदेशी.पप्पु सोनवने.आदी उपस्थित होते.

**वाढदिवस शुभेच्छा, निवड/ नियुक्ती शुभेच्छा जाहिरात, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री, उद्घाटन सोहळा जाहिरात तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात**

**✻ संपर्क ✻**

**९५४५९ १०१७७/८९९९९ २१९९४**

# पर्यावरणावर प्रेम करून निसर्ग वाचवू या...

दै. आवाज वृत्तसेवा...

सिडको :-(पांडवलेणी) दि.५ जून २०२५ देशाचे जबाबदार नागरिक म्हणून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करणे नैसर्गिक संसाधनांचा योग्य वापर करून प्रदूषण कमी करणे तसेच वन्यजीव आणि वनस्पतीचे संरक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.



दिवसान दिवस पर्यावरणाची हानी होत आहेसिंगल युज प्लास्टिकचा वापर,औद्योगीकरण, प्रदूषण, जल प्रदूषण, ध्वनिप्रदूषण, जंगलतोड, प्लास्टिक प्रदूषण, जागोजागी कचरा जाळणे आणि त्यात हवामानाचा बदल, यासारख्या समस्यामुळे पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहे.माणसाला श्वास घेणे ही मुश्किल झाले. कधी अवकाळी पाऊस, तर कधी खडक उन्हाळा... निसर्गचक्र बदलतेय,अर्थातच पर्यावरणाचा समतोल ढासळू लागला,ही भावी पिढीसाठी धोक्याची घंटा ठरू शकते आहे. त्यामुळेच हा निसर्गाचा इशारा समजून बदलण्याची गरज आहे.

आपल्या जन्मदिनी पार्टी करण्याऐवजी किमान एक झाड लावून त्याला पूर्णजन्मित करावे,ते झाड मोठं होऊन इतरांना ऑक्सिजन देईल तरच पूर्णजन्म स्थापित होईल. पर्यावरण म्हणजे हवा, पाणी, जमीन, वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांचा समावेश आहे ते आपल्या जीवनासाठी आवश्यक आहे.

यावेळी पर्यावरण प्रेमी म्हणाले की जो कोणी वृक्षावर खिळे ठोकून जाहिरात करेल त्याच्यावर गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्यात यावी.प्लास्टिक टाळून नवा मार्ग काढू चला उठा पर्यावरणावर प्रेम करून निसर्ग वाचूया... आपण शपथ घेऊया, की पर्यावरणाची हानी करणार नाही आणि होऊन देणार नाही. पांडवलेणी व सिडको परिसरात जागतिक पर्यावरण दिनानिमित्त स्थानिक जॉगर्स, राजे संभाजी व पवननगर क्रिडा संकुल जॉगर्स, पर्यटक आणि वनविभाग, नाशिक महानगरपालिका यांच्या मदतीने कृष्णवड, पिंपळ,वड, जांभूळ, चिंच, आंबा, उंबर, अंजीर, कडुलिंब, शेवगा, आपटे विविध प्रजातीचे वृक्षरोप व औषधी वनस्पती लावण्यात आले. त्यांची देखभाल स्थानिक जॉगर्स करणार आहे.

वृक्षरोपणाला पाणी टाकणे त्याभोवती सुरक्षित जाळी बसविणे जेणेकरून वृक्षरोपाची हानी होणार नाही.प्रत्येकाला नाव देऊन संगोपन करणार आहे. मोलाचे सहकार्य वनविभाग व नाशिक महानगरपालिका यांनी केले.

प्रास्ताविक बाळा धाकराव यांनी केले.

यावेळी सुनिल मटाले, अनिल पोटे, प्रकाश माळेकर, सत्यजित शिंदे, प्रशांत लोणारी, नितीन ढिकले, कमलाकर दिवे, सुधाकर टाव्हरे, चेतन पाटील, कैलास पाटील,शरद पोटे, दीपक दुधवडे, दूर्वा पोटे, तेजल वैष्णव, परी वैष्णव, आर्या खेडकर, जान्हवी मटाले, दर्शना मटाले, दिशा माळेकर, दीपक सोनवणे, नेहा दुधवडे, सागर पवार, गणेश दोंदे, सूर्यकांत शेट्टी, दत्ता डोके, मोनिका राठोड, स्नेहा काळे, मनीषा सुर्यवंशी, देवश्री पावसे, माधुरी जाधव, भाग्यश्री ढोकणे, वनविभाग व मनपा कर्मचारी आदी पर्यावरण प्रेमी उपस्थित होते.

# हतगड येथे संस्कृतीवर आधारित अनुभवात्मक पर्यटन विकसीत कार्यशाळेचा कार्यक्रम संपन्न

**दै. आवाज वृत्तसेवा...**

**लक्ष्मण पवार, हतगड –**

महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ नाशिक, गेली पंचवीस वर्षे सांस्कृतिक पर्यटन क्षेत्रात कार्यरत असलेली पश्चिम बंगाल मधील'कॉन्टॅक्ट बेस संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाशिक जिल्ह्यात सुरु असलेला सुरगाणा तालुक्यातील पिंपळसोंड, डोल्हारे, श्रीभुवन बर्डा, चिंचपाडा, वांगण सुळे या गावात अमूर्त सांस्कृतिक वारसा (ICH) आधारित अनुभवात्मक पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्यासाठी सुरु असलेल्या प्रकल्पाचा समारोप हतगड किल्ला येथील हॉटेल केसर येथे करण्यात आला.







या कार्यक्रमात शंभराहून अधिक कलाकारांनी सहभाग घेतला होता. तालुक्यातील पिंपळसोंड येथे भोवाडा सोंगे मुखवटे तयार करणे हस्तकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तर वांगण येथे पावरी नृत्य, डोंग-या देव नृत्य, चिंचपाडा मादोळ नृत्य, बर्डा येथे ठाक-या नृत्याचे प्रशिक्षण देण्यात आले. पारंपरिक खाद्य संस्कृती रानभाज्या, नागलीची भाकरी, उडीद दाळ, भुजा पाक कलेचे आयोजन या पाच हि गावात करण्यात आले होते. तर पारंपरिक वाद्ये पावरी, कहाळी, संबळ, माद-ोळ, तुर, ढोलकी, घुंगरू, डेरा, थाळी सांस्कृतिक कलेत डांगी नृत्य, ठाकर नृत्य, पावरी नृत्य, घागर नृत्य कला सादर करण्यात आले. हतगड येथे एक दिवसीय कार्यशाळेत पर्यटन कार्यक्रमांची रचना आणि प्रोत्साहन स्थानिक समुदायांचे आयसीएच प्रदर्शित करणे. कौशल्य विकास आणि थेट बाजारपेठेतील संबंधांद्वारे समुदाय क्षमता निर्माण करणे. अनुभवात्मक पर्यटनाच्या विपणन आणि प्रोत्साहनासाठी साधने विकसित करणे. आदिवासी खाद्य पदार्थ, पावरी नृत्य आणि बोहाडा, ठाकर,मादोळ नृत्यासह विविध नृत्याचे सादरीकरण करण्यात आले.

कालातीत कथा सांगणारी महाराष्ट्राची आदिवासी कला भोवाडा उत्सव हा नाशिकच्या जिवंत परंपरांचा शोध घेणे, बोहाडा मुखवटा बनवण्याचा आणि नृत्याचा अनुभव घेणे, सुरगाणा तालुक्यातील येथील पिंपळसोंड हे गाव मुखवटा आणि बोहाडा नृत्यासाठी ओळखले जाते. माजी सैनिक शिवराम चौधरी हे गेल्या साठ ते सत्तर वर्षा पासून मुखवटे तयार करतात. यामध्ये बोहाडा मुखवटा पौराणिक पात्रे, देव, देवता आणि राक्षसांचे प्रतीके आहेत.

सुरगाणा तालुका हा ठाकर नृत्य, मादोळ नृत्य, थाळी गाणे, कथाकथन, डोंगरी देव नृत्य आणि ढाक नृत्य यासह कला परंपरांनी समृद्ध असलेला अमूर्त पारंपरिक वारसा लाभलेला तालुका आहे.

पावरी आणि ढोल सारखी पारंपारिक लोकवाद्ये बनवण्याचा आणि वाजवण्याचा अनुभव घेता येतो. डोंगराळ जंगलाच्या परिसरात वसलेले, सुरग-ाणा तालुक्यातील निसर्ग संस्कृती पर्यटनाचा शोध घेण्याच्या संधी प्रदान करते आहे.

या कार्यशाळेत कॉन्टॅक्ट बेस पश्चिम बंगालचे मार्गदर्शक सुमन दास, संतू गुचाइत, गौतम सेन, राहुल नंदी,अरींदम दोळई, नंदलाल महातो यांनी मार्गदर्शन केले. यावेळी लोक कलाकार माजी सैनिक शिवराम चौधरी,माजी सरपंच राजेंद्र पवार, बोरगावचे सरपंच अशोक गवळी, गोंदुणे ग्रामपंचायतीच्या सरपंच संजाबाई खंबायत, पांडुरंग खंबायत, शिक्षक रतन चौधरी, मंगलदास गवळी, पंडित गायवन, पत्रकार हिरामण चौधरी, विष्णू बोरसे, लक्ष्मण बागुल, जल परिषदेचे देविदास कामडी, राकेश दळवी लक्ष्मण बंगाळ, काशिनाथ बंगाळ, गुलाब म्हसे, मोतीराम चौधरी, रंगू चौधरी, रमेश बागुल वन परिमंडळ अधिकारी नवनाथ गांगुर्डे, मुकुंद पाडवी सह नृत्य कलाकार उपस्थित होते.

# रंगधर्मी अजित भगत : नाट्यविद्यापीठ आणि प्रायोगिक नाटकाचे शेवटचे भीष्माचार्य – रवींद्र मालुसरे

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई (प्रतिनिधी) : मराठी प्रायोगिक रंगभूमीच्या पायाचे जे काही जे काही घट्ट दगड त्यातला एक पायरीचा दगड...म्हणजे अजित भगत. दादरच्या आविष्कार मध्ये म्हणजे छबिलदास शाळेचा दुसरा मजल्यावर जी आधाराची वा हक्काची आपली वाटावी अशी जी माणसे त्यात अरुण काकडे, सीताराम कुंभार आणि अजित भगत सर होते, मात्र त्यापेक्षा ज्या रंगभूमीची धूळ आपण गुलाला-सारखी कपाळाला लावली त्या पायरीचा आपण अविभाज्य भाग आहोत ह्याचा अभिमान मला जास्त महत्वाचा आहे असे भगत सर स्वतःला समजत असत. अजित भगत यांच्या निधनाने प्रायोगिक नाटक 'जगणारे रंगधर्मी', चालते बोलते नाट्यविद्यापीठ'. प्रायोगिक नाटकाचे 'शेवटचे भीष्माचार्य' आपल्यातून कायमचे विंगेत गेले आहेत असे भावपूर्ण उदगार रवींद्र मालुसरे यांनी काढले.

श्री विघ्नहर्ता प्रतिष्ठान मुंबई आयोजीत नाट्यतपस्वी अजित भगत स्मृती जागर नुकताच यशवंत नाट्य मंदिरच्या मिनी थिएटर मध्ये नुकताच साजरा झाला त्यावेळी मालुसरे प्रमुख पाहुणे म्हणून बोलत






होते. नाट्यचळवळीसाठी गेली ४० वर्षे निःस्वार्थीपणे विघ्नहर्ता प्रतिष्ठान जे प्रशंसनीय काम करीत आहे त्याचे कौतुक ज्येष्ठ लेखक आणि प्रकाशक डॉक्टर सुनील सावंत यांनी आपल्या भाषणात केले. तर ज्येष्ठ रंगकर्मी चेतक घेगडमल यांनी प्रायोगिकसाठी अजित भगत यांनी दिवसरात्र केलेली मेहनत आणि त्यांच्या अनेक आठवणी जाग्या भाषणात केल्या.कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विघ्नहर्ता संस्थेचे अध्यक्ष श्री दत्ता मोरे म्हणाले, अजित भगत यांचा मिश्किल, प्रेमळ, धाक वाटणारा चेहरा डोळ्यासमोर आहे. मित्र आणि मार्गदर्शक म्हणून मलाच नव्हे तर शेकडोंना ते मोठे होते. प्रायोगिक रंगभूमीवर मैलाचा दगड ठरलेली अनेक नाटके अजित सरांनी दिग्दर्शित केली. नाटक जगणारा हा माणूस होता.साध्या माणसांचा दिग्दर्शक होता.

यावेळी श्री नंदकुमार सावंत, श्रीमती चित्रा अरुण भगत, कथा लेखिका विद्या निकम, विजय सक्रे, राज जैतपाल, अमन दळवी, जयवंत सातोसकर यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ज्येष्ठ नाट्यलेखक आणि रंगकर्मी महेंद्र कुरघोडे यांनी कार्यक्रमाचे सुंदर प्रास्ताविक केले.

लेखक महेंद्र कुरघोडे लिखित मिशन विक्टरी, चांद तारा आणि मोक्ष या राज्यस्तरीय पारितोषिक विजेत्या नाटकांच्या कलाकारांचा सन्मान करण्यात आला, तर कार्यक्रमानंतर – पुढील ३ एकांकिका सादर करण्यात आल्या.

(१) एकांकिका ALEXA PLAY DESHPANDE'S WEAL लेखिका : मनाली काळे दिग्दर्शक : अमित सोलंकी


(२) एकांकिकाः बोकील वकील – लेखकः राजेश पाटील, संगीतः रमाकांत जाधव कलाकारः किरण सुधाकर शेट्ये, राजेश प्रभाकर सारंग, दिग्दर्शकः विलास गायकवाड

(३)एकांकिका – अनवा मवताव हरारी – लेखक : अजित देशमुख दिग्दर्शक आणि संगीत : रमाकांत जाधव, नेपथ्य : रोहन ठाकूर आणि कलाकारः अथर्व नाईक, प्रज्वल रणदिवे, दिशा नाईक.सांगता सोहळ्यास स्वामी कमलगिरीजी महाराज,विवेकानंद महाराज, रामानंद महार-ाज, अविर्मुक्तेश्वर महाराज, श्रीपादानंद महाराज, पांडुरंगानंद महाराज, गोपालकृष्णानंद महाराज, सच्चिदानंद महाराज, नर्मदेश्वरानंद महाराज यांसह आश्रमीय संत व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती शिवाजी महाराज द ग्रेटेस्ट डॉक्युमेंट्री ऑनलाइन विनामूल्य दाखवणार

**दै. आवाज वृत्तसेवा...**

मुंबई (रवींद्र मालुसरे) : श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल ही संस्था छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत ठेवून त्यांच्या कार्याला जागतिक स्थान मिळवून देण्यासाठी कार्य करते. संस्थेच्या वतीने संपूर्ण ६ ते ११ जुनपर्यंत सोशल मीडियाचा वापर करून शिवराज्याभिषेक सप्ताह साजरा करण्यात येत आहे. छत्रपती शिवाजी महार-ाज द ग्रेटेस्ट या विषयावरील मराठी भाषेतील डॉक्युमेंटरीच्या दोन लिंक शिवप्रेमी, शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी यांच्यासह सर्वांना विनामूल्य पाठविण्यात येणार आहेत.




अलेक्झांडर ते नेपोलियनपर्यंत सर्व जागतिक योध्यांशी शिवाजी महाराजांची तुलना करणारा आणि शिवाजी महाराजांचा अद्वितीय पुरुष म्हणून गौरव करणारी ही डॉक्युमेंन्ट्री पहिली आहे. यात महाराजांच्या चरित्राचे सर्वंकष प्रस्तुतीकरण केले आहे. त्यात विश्व इतिहासातील अन्य राजयोध्यांच्या व्यक्तीमत्वाशी तुलनात्मक अध्ययन अत्यंत पठनीय आहे. महाराजांच्या जीवनावर अनेक पुस्तके लिहिली, चित्रपट – मालिका आल्या, परंतु अन्य जागतिक ऐतिहासिक व्यक्तीमत्वांच्या जी-वनाशी तुलनात्मक अध्ययन प्रकाशित करुन डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी एक नवा उपक्रम आरंभ केला आहे. ही डॉक्युमेंटरी पाहिल्यानंतर सर्वांकडून प्रतिसाद आणि प्रतिक्रिया आम्हाला अपेक्षित आहे. याच विषयावरील डॉ हेमंतराजे गायकवाड यांचा सर्वाधिक खपाचा ग्रंथ विक्रीसाठी उपलब्ध आहे.अधिक माहिती आणि लिंकसाठी डॉ. हेमंतराजे गायकवाड – चेल ९८७०५३५३१० यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# शेतकरी नेते कवळे गुरुजी यांची हणमंते परिवारास सांत्वन पर भेट

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदेड – उमरी हरवलेलं छत्राची आई बनली व्हीपीके पतसंस्था वारस मुलाला दत्तक घेऊन शैक्षणिक खर्चाची घेतली जबाबदारी तसेच व्याही महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. ना. मकरंद आबा पाटील यांना दूरध्वनी वरून संपर्क करून जिल्हाधिकारी नांदेड व उमरी तहसीलदार प्रशान्त थोरात यांना तात्काळ मदत करण्यात यावी अशी मागणी केली व्हीपीके पतसंस्था ही सामाजिक बांधिलकी जोपासात त्वरित मदत करण्यासाठी नेहमी तत्पर राहते.



गोदावरी नदीपात्रात कपडे धुण्यासाठी गेलेल्या मायलेकींसह पुतणीचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही घटना तालुक्यातील भायेगाव येथे शनिवारी दुपारी घडली. महानंदा भगवान हणमंते वय ३५ पायल भगवान हणमंते १३ ऐश्वर्या मालू हणमंते १३ अशी मृतांची नावे आहेत. महानंदा दोघींना घेऊन कपडे धुण्यासाठी नदीवर गेली होती. कपडे धूत असताना बाजूला पाण्यात खेळत असलेली पायल खड्यात बुडायला लागली.

आई महानंदाने तिला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र, दोघीही पाण्यात बुडाल्या. यावेळी ऐश्वर्या या दोघींचा हात धरायला गेली. तर तीही पाण्यात बुडाली. ही बातमी समजताच व्हीप-ीके पतसंस्थेचे चेअरमन मारो-तराव कवळे गुरुजी यांनी तात्काळ सांत्वन पर भेट देऊन वारस मुल-ाला दत्तक घेतले यावेळी गावा-तील जेष्ठ आनंदराव पाटील कदम, मधुकर पाटील बोलसेकर, बाप-ूराव पाटील शिंदे, ज्ञानेश्वर पाटील कदम पतसंस्थेचे सचिव नागन-ाथ पांचाळ, गोविंदराव पाटील राहटीकर, भगवान कोकणे, मारो-तराव सर्जे, सह गावातील ग्रामस्थ उपस्थित होत

# सातापा कांबळे यांचा महाराष्ट्र शासनाच्या 'डॉ. आंबेडकर समाजभूषण' या पुरस्काराने होणार सन्मान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

बस्तवडे ता. कागल येथील सामाजिक कार्यकर्ते सातापा पुंडलिक कांबळे यांना महाराष्ट्र सरकारच्या वतीने देणेत येणारा सन -२०२५ चा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे.



सामाजिक न्याय व विशेष सहायता विभागाच्या वतीने देणेत येणारा हा मनाचा पुरस्कार असून सामाजिक कार्यातील भरीव कामगिरी बद्दल दिला जातो. सातापा कांबळे यांनी गेली सुमारे ३० वर्षे विविध सामाजिक कार्याच्या माध्यमातून केलेल्या सेवा कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. बस्तवडे गावचे सरपंच तसेच निराधार समितीच्या माध्यमातून ते वंचितांसाठी काम करीत आहेत. त्यांना जाहीर झालेल्या या महाराष्ट्र शासनाच्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.